Bar Council of Maharashtra & Goa
2nd Floor, High Court Extension, Fort, Mumbai - 400 032. ✆ : 022-6938 1033 / 6938 1037
Website : www.barcouncilmahgoa.org • Email : barcouncilmahgoa@gmail.com

# जाहिर निवेदन

दि. २८ जानेवारी, २०२४

अहमदनगर जिल्हयातील राहुरी तालुक्यातील राहुरी वकिल संघाचे सदस्य स्व. ॲड. राजाराम जयवंत आढाव आणि स्व. ॲड. मनिषा राजाराम आढाव या वकिल दांपत्याच्या क्रूर व अमानवी हत्येबद्दल महाराष्ट्र आणि गोवा वकिल परिषद तीव्र शब्दांमध्ये संताप व निषेध व्यक्त करीत आहे. या दुःखद घटनेने संपूर्ण वकिल जगत हादरुन गेलेले आहे. अशा प्रकारे एखादया वकील दांपत्यावर घटना घडत असेल तर संपूर्ण न्यायव्यवस्थेसाठी ही चिंताजनक बाब आहे. पोलीस प्रशासनाने याबाबतीत त्वरीत कारवाई करून आरोपींना अटक केलेली असली तरीही या आरोपींना जलद गतीने कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करून कठोर शिक्षा देण्यात यावी अशी मागणी महाराष्ट्र आणि गोवा वकिल परिषद करीत आहे.

महाराष्ट्र आणि गोवा वकिल परिषदे च्या वतीने महाराष्ट्राचे गृहमंत्री माननीय श्री देवेंद्र फडणवीस यांच्यासोबत संपर्क करण्यात आलेला असून त्यांच्या कानावर आपल्या सर्वांच्या शोक संतप्त भावना टाकण्यात आलेल्या आहेत. मा. गृहमंत्री स्वतः या प्रकरणात जातीने लक्ष ठेऊन आहेत.

आढाव वकील दाम्पत्यास आपणा सर्वांच्या वतीने दुःखद अंतःकरणाने महाराष्ट्र आणि गोवा वकिल परिषद श्रद्धांजली अर्पण करीत आहे. तसेच त्यांच्या कुटुंबियांवर दुःखाचा जो डोंगर कोसळला आहे. त्यातून सावरण्याची परमेश्वर त्यांना शक्ती देवो. आढाव परिवाराच्या दुःखामध्ये महाराष्ट्र आणि गोवा वकिल परिषदेचे सर्व वकिल सहभागी आहेत. तसेच या प्रकरणात न्याय मिळेपर्यंत महाराष्ट्र आणि गोवा वकिल परिषद स्थानिक सर्व वकील बंधु-भगिनींच्या मदतीने लक्ष देऊन कार्यरत राहील याची ग्वाही महाराष्ट्र आणि गोव्यातील तमाम वकील बंधू भगिनींना देत आहे.

अशा घटनांमुळे विचलित न होता, महाराष्ट्रातील सर्व वकील बंधू भगिनींनी आपले कार्य निर्भीडपणे करीत राहावे, असे आवाहनही महाराष्ट्र आणि गोवा वकिल परिषद करीत आहे.

वकिल संरक्षण कायदा त्वरीत मंजूर करणेकामी महाराष्ट्र आणि गोवा वकिल परिषद कटिबध्द आहे.

| ॲड. राजेंद्र उमाप | ॲड. पारिजात पांडे | ॲड. जयंत जायभावे |
|---|---|---|
| उपाध्यक्ष | अध्यक्ष | सदस्य |
| महाराष्ट्र आणि गोवा वकिल परिषद | महाराष्ट्र आणि गोवा वकिल परिषद | भारतीय विधिज्ञ परिषद |

## सदस्य

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ॲड. मोतीसिंग मोहता | ॲड. गजानन चव्हाण | ॲड. मिलिंद पाटिल | ॲड. मिलिंद थोबडे | ॲड. वसंत साळुंके |
| ॲड. हर्षद निंबाळकर | ॲड. अण्णाराव पाटिल | ॲड. अविनाश भिडे | ॲड. सतिश देशमुख | ॲड. सुदिप पासबोला |
| ॲड. वसंतराव भोसले | ॲड. अनिल गोवारदिपे | ॲड. सुभाष घाटगे | ॲड. विवेकानंद घाटगे | ॲड. विठ्ठल कोंडेदेशमुख |
| ॲड. आसिफ कुरेशी | ॲड. डॉ. उदय वारुंजीकर | ॲड. संग्राम देसाई | ॲड. अहमदखान पठाण | ॲड. आशिष देशमुख |
| ॲड. अविनाश आव्हाड | ॲड. अमोल सावंत | | | |